# Dr. Madhukarrao Wasnik
# PWS Arts and Commerce College
### Kamptee Road, Nagpur-26

## Chapters in Book

| Sr No | Title of the Article | Name of the Author | Title of the Book & ISBN | Publisher | Year of the Publication |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Vishvaratna Babasaheb Dr. Ambedkaranchi rashtriya Karye | Dr. Mahendra Gayakwad | Bharat Bhagya Vidhata Dr. Babasaheb Ambedkar ISBN 978-31-933092-5-4 | Lotus & Kobra Publishing House | 2017 |
| 2. | Itihas Lekhan Karyakaran Bhav | Dr. Mahendra Gayakwad | Nivadak Shodh Nibandh Kand Atharava (2017-18)ISBN -978-87558-0803 | Itihas Parishad Adhiveshan -50 | 2018 |
| 3. | Itihas Lekhanatil Kagadpatrache Parikshan | Dr. Mahendra Gayakwad | Nivadak Shodh Nibandh Kand Atharava (2018-19)ISBN -978-93-8755-31-1 | Itihas Parishad Adhiveshan -51 | 2019 |
| 4. | Vaishvik Shanti ki Stapana me Boudha Darshan ki Prasangikata | Dr. Mahendra Gayakwad | Buddhism: Its relevance & Reflections in Modern EraISBN-978-93-92693-24-3 | Women Empowerment Sangh Nagpur (India)Imprint of Lotus & Kobra Publishing House, | 2022 |


**Principal**

**Dr. Yeshwant Patil**

सुधारित आवृत्ती

## भारत-भाग्य-विधाता

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर





**मानद संपादक**
**डॉ. भाऊसाहेब लोखंडे**

**कार्यकारी संपादक**
**डॉ. प्रज्ञा बागडे**


Scanned with CamScanner

सुधारीत आवृती

गौरव ग्रंथ

# भारत-भाग्य-विधाता
# DISPENSER OF INDIA'S DESTINY
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**लोटस अ‍ॅन्ड कोब्रा पब्लिशिंग हाऊस,**
**नागपूर-४४००१०**

Scanned with CamScanner

भारत-भाग्य-विधाता डॉ.बाबासाहेब आंबेडकर –
Bharat-Bhagya-Vidhata Dr Babasaheb Ambedkar

संपादक मंडळ (Editorial Board)

**प्रकाशक**
लोटस ॲन्ड कोब्रा पब्लिशिंग हाऊस
C/o. अश्वजीत पाटील, ४२५, न्यू खदान, लष्करीबाग, नागपूर–१७
मो. नं. ९०९६९२४८०८ / ९४०५२३८४५८
e-mail : lotusandcobraph@gmail.com

प्रथम आवृत्ती– १४ एप्रिल २०१७
ISBN **978-81-933092-5-4**
सुधारीत आवृत्ती– २०१९
ISBN **978-93-87250-24-6**

"या ग्रंथातील भाग–ब मधील प्रकाशित लेखांच्या विषयवस्तुशी अथवा लेखकांच्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. प्रकाशित लेख हे संबंधित लेखकांची स्वत: कृती असून त्या अनुषंगाने कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यास संबंधित लेखांचे लेखकच सर्वस्वी जबाबदार असतील"

The responsibility for the facts stated, opinions expressed, or conclusions reached is entirely that of the author of the articles and The Publisher as well as Editorial Board accepts no responsibility for them. If any dispute arise in this regard that will be subjected to under the jurisdiction of Nagpur District Court only.

**अक्षर जुळवणी व मुखपृष्ठ रचना**
अश्वजीत पाटील, संचालक,
कलात्मक प्रिंटींग ॲन्ड बाईंडिंग ब्यूरो
४२५, न्यू खदान, लष्करीबाग, नागपूर–१७
M : 9373178748, e-mail : p28ashwa@gmail.com

**मुद्रण**
पंचशिल ग्राफिस, बाळाभाऊपेठ, नागपूर–१७

Scanned with CamScanner

सुधारीत आवृत्ती– २०१९

# भारत भाग्य-विधाता डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**मानद संपादक**
प्रा. डॉ. भाऊसाहेब लोखंडे

**कार्यकारी संपादक**
प्रा. डॉ. प्रज्ञा बागडे

**संपादक**
प्रा. डॉ. चंद्रशेखर पाटील
प्रा. डॉ. महेन्द्र गायकवाड
प्रा. अश्ववीर गजभिये

**सहसंपादक**
प्रा. डॉ. मनोहर कुंभारे
प्रा. डॉ. सुशांत चिमनकर
प्रा. डॉ. नागसेन लांडगे

**उपसंपादक**
प्रा. डॉ. रक्षित बागडे  प्रा. पुरण लोणारे  प्रा. डॉ. आनंदकुमार राऊत
प्रा. डॉ. माधव सोनेकर  प्रा. विनोद मेश्राम

**सल्लागार मंडळ**

- मा. न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील
  माजी न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय,
  'समता', सी–48, अभिमानश्री सोसायटी, पाषाण रोड, पुणे–411008
- डॉ. प्रदीप शा. मेश्राम
  माजी प्राध्यापक व विभागाध्यक्ष, प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती व पुरातत्त्व विभाग,
  रा.तु.म.नागपूर विद्यापीठ, नागपूर
- डॉ.शंकर खोब्रागडे (एम.बी.बी.एस., एम.डी., एफ.आय.ए., एम.एस., एम.ए., एम.बी.ए.)
- आचार्य (ॲड.) संदेश
  मिलिंद फुलझेले (नि.स.दैनिक महानायक)
- भिमराव गणवीर (प्रसिद्ध हिन्दी साहित्यीक)
- दीक्षित आवळे, इतिहास तज्ज्ञ, डॉ.आंबेडकर कॉलोनी, लष्करीबाग, नागपूर–17
- प्रा. प्रकाश जंजाळ
  मराठी विभाग–श्री.की.न.गो.महाविद्यालय, कारंजा लाड, जि. वाशिम
- ॲड. मानवेन्द्र हरिदास आवळे
- ॲड. संजयकुमार जी. पाटील

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका

## भाग-अ : युगपुरुष डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रकल्याणार्थ संदेश


१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान सभागृहातील राष्ट्रकल्याणार्थ केलेले प्रथम ऐतिहासिक भाषण ३२
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या घटना समितीसमोर गुरुवार, दिनांक ४ नोव्हेंबर १९४८ रोजी केलेले भाषण ४२
३. लोकशाहीच्या यशस्वी कामकाजाच्या पूर्वावर्ती शर्ती २२ डिसेंबर १९५२ ला पुणा डिस्ट्रीक्ट लॉ लायब्ररीच्या हॉल मध्ये केलेले भाषण ६५
४. भारतीय लोकशाहीचे भवितव्य ८१
५. लोकशाहीचे शत्रु ३ एप्रिल १९५५ रोजी मुंबई येथे दिलेले भाषण ८६
६. धार्मिक कायदा विरुद्ध धर्मनिरपेक्ष कायदा ८९
७. चारित्र्यवान पुढारी आणि देशाचे भवितव्य ९१


## भाग-ब : प्रज्ञावंतांचे लेख


१. राज्यघटनेचा सरनामा व डॉ. आंबेडकर
न्या. पी.बी.सावंत ९४
२. डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर आणि राष्ट्रीय एकात्मता :
न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी ९६
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानाचे 'रिडल' –
डॉ.भाऊ लोखंडे १०२
४. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मदीक्षेची फलश्रुती : वास्तविकता आणि अपेक्षा
निरज ग. बोधी 121
५. कोहीनूर भारताचा
प्रा. विनोद मेश्राम १३२
६. धम्म दीक्षेच्या ६२ वर्षातील वास्तव
प्रा. पुरण लोणारे १३५
७. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भारतीय शासनप्रणालीमध्ये बुद्ध धम्माची देण
प्रा. डॉ. बालचंद्र खांडेकर १४१




Scanned with CamScanner

८. सर्वश्रेष्ठ कायदे पंडित डॉ. बाबासाहेब आंबेडकर
भीमराव गणवीर १४८
९. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि शिक्षण
डॉ. आनंदकुमार बि. राऊत १५६
१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अर्थचिंतनातील स्त्रीमुक्तीचा
आशय प्रोफेसर
डॉ. शैलेंद्र लेंडे १६३
११. बाबासाहेबांचे शैक्षणिक विचार
डॉ. माधव सोनेकर १७६
१२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार
प्रा.डॉ.प्रज्ञा बागडे १८३
१३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बुद्धधम्म स्वीकार व
मिळालेली प्रतिष्ठा
दीक्षित आवळे १८९
१४. विश्वरत्न बाबासाहेब डॉ.आंबेडकरांचे राष्ट्रीय कार्ये
डॉ.महेंद्र गायकवाड २००
१५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे इतिहास विषयातील योगदान :
संक्षिप्त आढावा
प्रा. अश्ववीर गजभिये २०८
१६. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लोकशाहीविषयक दृष्टिकोन
डॉ. (कु) शिल्पा अमृत बन्सोड २१७
१७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एक सारगर्भित अवलोकन
भिक्खुनी मैत्रीय २२८
१८. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर भाष्य करणारे डॉ. आंबेडकर
प्रा. दिलीप वानखडे २३६
१९. डॉ. आंबेडकर : बौद्ध धम्मासंबंधी लेखांचे महत्व
प्रा.रजनी कानेकर (जोगे) २४२
२०. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता
प्रा. डॉ. मनोहर तुळशीराम कुंभारे २४७



Scanned with CamScanner

# १४. विश्वरत्न बाबासाहेब डॉ.आंबेडकरांची राष्ट्रीय कार्ये

डॉ.महेंद्र गायकवाड

**पार्श्वभूमी** :– भारतात १९ व्या शतकांत इंग्रजी राजवटी विरोधात स्वातंत्र प्राप्तीसाठी काही उच्चभ्रू सुशिक्षित वर्ग राजकीय चळवळी स्थापन करून संघर्ष करायला पुढे आला. याच काळात काही सुशिक्षित भारतीय पाश्चात्य शिक्षणात शिकून आधुनिक मानवीय मूल्यांचा परिचयात आल्यामुळे सामाजिक व धार्मिक चळवळी स्थापन करायला पुढे आला.भारतातील विषमतावादी संस्कृतीने मानवा–मानवामध्ये भेद करणाऱ्या वर्णव्यवस्थेची निर्मिती करून वर्णागणिक उतरत्या क्रमाणे कामाची विभागणी केली. यातूनच पुढे जातीय व्यवस्थेचा उदय होऊन भारतीय समाज हजारो जातींमध्ये विभागला गेला.क्षत्रियांचेच कर्म सरंक्षण करणे ठरविल्या गेल्यामुळे भारतावर होणाऱ्या बाहय आक्रमणापासून भारताचे सरंक्षण करण्याची जबाबदारी एकूण लाकसंख्येतील केवळ आठ–दहा टक्के लोकांवर येऊन पडली.

बाहय आक्रमणापासून संरक्षण करण्याच्या कार्यांत या आठ–दहा टक्के लोकातील चार ते पाच टक्के हया महिला असल्यामुळे सरंक्षणाच्या दृष्टीने त्या निरर्थक होत्या.आता क्षत्रियांमध्ये वाचलेल्या चार ते पाच टक्के लोकांचेच कार्य सरंक्षणाचे राहिले.क्षत्रिय वारंवार युद्ध करीत असल्यामुळे यातील एक टक्का लोक लंगडे,लुळे व निकामी झाले.वाचलेल्या तीन ते चार टक्के क्षत्रियांमध्ये एक टक्का बालके तर एक टक्का म्हातारे होते. त्यामुळे एकूण लोकसंख्येतील केवळ दोन टक्के लोकांवर बाहय आक्रमणापासून देश सरंक्षणाची जबाबदारी देण्यात आल्याने आपल्या देशावर शक,कुशाण,मुस्लीम,पोर्तुगीज,डच,फ्रान्स आणि इंग्रजांनी हजारो वर्षे आपल्या देशावर राज्य केले.

**वर्णव्यवस्थेद्वारा भारतीय समाजाचे नुकसान** :–भारतीय समाज जीवनात अस्पृश्यतेसारख्या अमानवीय प्रथेचा उदय झाला.हया प्रथेने हिंदू समाजातील एक मोठा घटक जन्मजात अमंगल ,अपवित्र आणि अशुभ समजल्या जाऊ लागले. त्यांचे जीवन जनावरापेक्षाही नित्कृष्ठ दर्जाचे होते.मानवी विकासाला आवश्यक असणा–या शिक्षण, सत्ता, संपत्ती आणि शस्त्र ठेवण्याचा अधिकार त्यांच्यापासून हिराऊन घेण्यात आला. त्यामुळे अस्पृश्य समाजातील मोठा घटक ईस्लाम धर्मात धर्मातर करू लागला. हजारो वर्षापासून ही अनिष्ठ प्रथा भारतात सुरू होती. या व्यवस्थेने अस्पृश्याचे जीवन नरकमय करून टाकले होते.अस्पृश्यांच्या स्पर्शाने विटाळ होतो त्यामुळे त्याला हेटाळण्यात आले. अशा असहाय,अधिकारविहीन आणि माणुसकीचे साधे अधिकार नाकारलेल्या हिंदू समाज



Scanned with CamScanner

व्यवस्थेतील मोठया घटकाला पहिल्यांदा माणूस म्हणून सन्मानाने जगता येईल यासाठी संघर्ष करणे काही सुशिक्षित भारतीयांना राजकीय स्वातंत्र्यापेक्षा अस्पृश्यता निर्मुलनाच्या कार्याला प्राथमिकता देणे अत्यावश्यक वाटू लागले.

अस्पृश्यता निर्मुलनाच्या चळवळीची पार्श्वभूमी आणि डॉ.आंबेडकरांच्या नेतृत्वाचा उदय:—भारतीय अस्पृश्य समाजाची दयनीयता दूर करण्यासाठी सर्वप्रथम बंगाल प्रांतात गुरूचंद ठाकूर यांनी प्रयत्न केले.महाराष्ट्रात महात्मा फुले यांनी अस्पृष्यांना शिक्षणाच्या प्रवाहात अणन्याचा प्रयत्न केला.आगरकर,लोकहितवादी,रानडे आणि छत्रपती शाहू महाराजांनी राजकीय स्वातंत्र्यापेंक्षा अस्पृश्यांना माणूस म्हणून अधिकार मिळवून देण्यासाठी सामाजिक सुधारणांना अग्रक्रम दिला.तर टिळक,गोखले,गांधीजी आणि सुभाषचंद्र बोस यांनी राजकीय स्वातंत्र्याला महत्व देऊन स्वातंत्र्य प्राप्तीसाठी संघर्ष सुरू केला.इंग्रजांनीही गरज म्हणून अस्पृश्यांना लष्करामध्ये सेवेची संधी दिल्यामुळे आणि अस्पृश्यानाही शिक्षणाची दारे मोकळी केल्यामुळे अस्पृश्य समाज जागृत होऊ लागला. अस्पृश्य समाजातील सुशिक्षित वर्ग अस्पृश्यांची दयनीयता दूर करण्याच्या प्रयत्नांना प्राथमिकता देऊ लागला. महर्षी वि.रा.शिंदे,विठोजी मुन,कि.फा.बन्सोड,अ.का.गवई कालीचरन नंदागवळी इ.नेत्यांनी अस्पृश्यांना जागृत व संघटित करण्याच्या कार्याला लागला होता अशा स्थितीत भारतात अस्पृश्यांना माणूस म्हणून अधिकार मिळवून देण्यासाठी अस्पृश्यतेचा मुक्तिदाता म्हणून विश्वरत्न बाबासाहेब डॉ.आंबेडकरांचा भारताच्या राजकीय क्षितिजावर उदय झाला.त्यांनी हलाखीच्या जीवनाचा सामना करूण प्रसंगी रस्त्यांवरील दिव्याखाली बसून तर कधी—कधी मिळेल तिथून मदत मिळवून उच्च शिक्षण प्राप्त केले.अमेरिका व लंडनमधील ग्रंथालये वाचून काढली.विद्येची अखंड साधना केली.छत्रपती शाहू महाराजाच्या मदतीने त्यांनी अस्पृश्यांची कैफियत दूर करण्यासाठी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला.

डॉ. आंबेडकरांनी साऊथबरो कमिटीला एक निवेदन देऊन अस्पृश्यांची कैफियत पहिल्यांदा इंग्रज सरकारसमोर मांडली.अस्पृश्यांच्या मागण्याचे निवेदन इंग्रज सरकारसमोर मांडले.यानंतर त्यांनी अस्पृश्यांना जागृत व संघटित करण्यासाठी सभा व संमेलनांना मार्गदर्शन करू लागले.मुकनायक,बहिष्कृत भारत,समता,जनता आणि प्रबुद्ध भारत यासारख्या नियतकालीकांमधून लेखनकार्य व पत्रकारिता करून अस्पृश्यांना प्रबोधित करायला सुरुवात केली.१९२४ ला अखिल भारतीय बहिष्कृत हितकारणी सभा स्थापन करून अस्पृश्य समाजासाठी जमिनी स्थरावर कार्य करायला सुरुवात केली. १९२७ ला सामाजिक कार्यात भाग घेण्यासाठी आणि समतेची स्थापना करण्यासाठी ''समता सैनिक दलाची'' स्थापना करण्यात आली. याच वर्षी त्यांनी अस्पृश्य हा हिंदू

समाज व्यवस्थेचा घटक असून इतर स्पृश्य हिंदूप्रमाणे आम्हालाही समतेचे अधिकार द्या या मागणीसाठी जनआंदोलने सुरू केली.

**चवदार तळयाचा सत्याग्रह** :—महाडमधील चवदार तळयाचा सत्याग्रह करून इतर स्पृश्य हिंदूप्रमाणे माणूस म्हणून आम्हालाही सार्वजनिक ठिकाणी (जिथे जनावरे पाणी पितात तिथे) पाणी पिण्याचा समतेचा हक्क आहे हे सिद्ध करण्यासाठी जगाच्या इतिहासात आजवर कुठेही झाला नाही तो सत्याग्रह सुरू करावा लागला.सार्वजनिक ठिकाणचे पाणी पिल्याने आम्ही अजरामर होणार नाही परंतु आम्हाला समतेचा अधिकार प्रस्तापित करावयाचा आहे.यासाठीच हा आमचा सत्याग्रह असून या सत्याग्रहाची तुलना डॉ.आंबेडकरांनी फ्रेंच राज्यक्रांतीशी केलेली आहे.अस्पृश्यांच्या दयनीयतेला जबाबदार असलेल्या मनुस्मृती या अन्यायी धर्मग्रंथाची सार्वजनिक ठिकाणी ग्रंथप्रेमी डॉ. आंबेडकरांनी(ज्यांनी ग्रंथालयासाठी राजगृह नावाचे घर बांधून जवळपास ४०,००० ग्रंथ संचय केला होता) प्रतिकात्मक दहन केले.

**मंदिर प्रवेश चळवळी** :—भारतीय अस्पृश्य हा हिंदू धर्माचा एक महत्त्वपूर्ण घटक असून इतर स्पृश्य हिंदू प्रमाणे आम्हालाही आमच्या आराध्य देवतांची पूजा,उपासना व आराधना करण्याचा हक्क आहे हा समतेचा हक्क प्राप्त करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी काळाराम मंदिर प्रवेश,पर्वती मंदिर,अंबादेवी मंदिर इ.मंदिर प्रवेशाची जनआंदोलने केलीत.स्पृश्य हिंदूनी त्यांना अजिबात प्रतिसाद दिला नाही.स्पृश्य हिंदू अस्पृश्यांना आपले धर्मबांधव म्हणून समतेचे अधिकार देण्यास अजिबात तयार नव्हते.

**गोलमेज परिषदेतील राष्ट्रीय भूमिका** :—याचकाळात भारत भेटीवर आलेल्या सायमन कमिशनला भेट देऊन अस्पृश्य समाजाच्या वतीने मागण्यांचे निवेदन दिले. सायमन कमिशनच्या रिपोर्टच्या आधारावरच लंडनला गोलमेज परिषदांचे आयोजन करण्यात आले.या परिषदेकरिता अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. आंबेडकरांना निमंत्रित करण्यात आले.त्यांनी हजारो वर्षांपासून अस्पृश्य जगत असलेल्या नरकीय यातनापूर्ण जीवनाचे विदारक चित्र आणि अस्पृश्यांची कैफियत इंग्रज सरकारच्या निदर्शनास आणून दिली.

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांकरिता स्वतंत्र्य मतदारसंघ,अस्पृश्यांसाठी केंद्रीय व प्रांतीय कायदेमंडळात राखीव जागा आणि अस्पृश्यांना राखीव व सयुंक्त मतदारसंघात असा दुहेरी मतदानाचा अधिकार अस्पृश्यांना मिळणे किती आवश्यक आहे हे इंग्रज सरकारच्या निदर्शनास आणून देण्याचे कार्य डॉ.आंबेडकरांनी केले.याचाच आधार घेऊन इंग्रज सरकारने जातीय निवाडयानुसार या तिन्ही मागण्या मंजूर केल्या.इंग्रजांच्या देशात जाऊन डॉ. आंबेडकरांनी इंग्रजी राजवटीतही अस्पृश्यांची दयनीयता काहीच कमी झाली



Scanned with CamScanner

नसून इंग्रजांनी आमच्या देशातून चालते व्हावे असा इशारा त्यांच्या गृहदेशात जाऊन दिला.गांधीजीच्या दहावर्षापूर्वी चले जाव म्हटले

**पुणे करार** :–इंग्रजांनी अस्पृश्यांना दिलेल्या अधिकारांविरोधात गांधीजींनी पुणे येथील येरवडा तुरुंगात प्राणांतिक उपोषन सुरू केले.वेळप्रसंगी अस्पृश्यांच्या मिळालेल्या सवलतींना सोडून देऊन राष्ट्रहीत लक्षात घेऊन डॉ.आंबेडकरांनी गांधीजीसोबत पुणे करारावर स्वाक्षरी केली. पुणे करारामुळे अस्पृश्यांना स्वतंत्र्य मतदारसंघ आणि दुहेरी मतदानाचा अधिकार सोडावा लागला त्या मोबदल्यात गांधीजीचे प्राण वाचविण्याला डॉ. आंबेडकरांनी (याउलट नथुराम घोडसे यांनी फाळणीच्या वाटयातील पाकिस्थानच्या वाटयाचे ५५ करोड रू.देण्यासंदर्भात नेहरू सरकारकडे आग्रह करताच मुस्लिमांच्या वेशात जाऊन गांधीजीवर गोळया झाडून हत्या करण्यात आली आणि आज गोडसेंचं उदात्तीकरण केल्या जात आहेत)प्राथमिकता दिली.

**रिझर्व बॅंकेच्या उभारणीत आणि निर्मितीमागील भूमिका** :–आज जगात भारत महासत्ता म्हणून उदयास येत आहेत.भारताच्या आर्थिक व्यवस्थेचा कणा असलेल्या आणि भारताच्या वित्तीय स्थितीच्या निर्णयाची मुख्य भूमिका निभावणा–या रिझर्व बॅंकेच्या उभारणीत आणि निर्मितीमागील भूमिका डॉ. आंबेडकरांची होती.हिलटन यंग यांना डॉ.आंबेडकरांनी जे मेमोरंडम सादर केले त्यात भारतीय वित प्रबंधाविषयी शासनाच्या भूमिकेविषयी त्यांनी विस्ताराने लिहिले आहे.चलन निर्मिती आणि चलन प्रबंधन हे शासनाच्या अधिकार क्षेत्रात न ठेवता स्वतंत्र वित्तीय संस्थेच्या नियंत्रनात देवुन त्यात शासनाचा हस्तक्षेप नसावा अशी महत्त्वपुर्ण सूचना त्यांनी केली होती.रिझर्व बॅंकेच्या वित्तीय नियंत्रणामुळेच जगातील विकसित राष्ट्रात आर्थिक मंदी असली तरी त्याची विशेष अशी झळ भारताला बसत नाही. भारतीय अर्थव्यवस्था स्थिर असण्यामागे रिझर्व बॅंकाची भूमिका महत्त्वपुर्ण आहे.वित्तीय विनिमयाचा दर काय असावा ?याचा आधारही डॉ. आंबेडकरांचा "दी प्राब्लेम ऑफ रूपी" हा डॉ. आंबेडकर लिखित ग्रंथच आहे.

**स्वतंत्र मजूर पक्षाचे कार्य** : १९३७ ला डॉ.आंबेडकरांनी महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करून प्रभावी विरोधी पक्ष म्हणून अनेक विधायक आणि रचनात्मक कार्यात भाग घेऊन अनेक विधेयके मांडली.महार वतन विधेयक,खोतीप्रथा उन्मुलन विधेयक,भारताच्या वाढत्या लोकसंख्येवर उपाय आणि शिक्षणाविषयी शासनाच्या धोरणाविषयी आपले मुलगामी विचार मांडले. स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करून त्यांनी शेतकरी व मजुरांच्या अनेक समस्यांना वाचा फोडली.द्वितीय महायुद्धात डॉ.आंबेडकरांनी लोकशाही राष्ट्राच्या बाजूने आपले समर्थन जाहीर केले.



Scanned with CamScanner

लोकशाही शासनव्यवस्था जिवंत रहायलाच पाहिजे यातच जगाचे व भारताचे भविष्य सुरक्षित आहे हे त्यांचे मत होते.याउलट मार्क्सवादी संघटनांची दुबळया व कमजोर राष्ट्रांना गिळंकृत केलेल्या रशिया व चीनचे समर्थन केले तर उजव्या विचारांच्या संघटनांनी जर्मनी व इटाली या हुकुमशाही राष्ट्रांच्या बाजूने आपले समर्थन जाहीर केले.पुढे हुकुमशाही राष्टांचा पराभव होऊन लोकशाही राष्टांचा विजय झाला. यावरून डॉ.आंबेडकरांची वैचारिक प्रगल्भता आणि दूरदृष्टीची आपल्याला कल्पना येईल.

१९४२ ला सत्ता हस्तांतराचा आढावा घेण्यासाठी इंग्लंडच्या संसदेने त्रिमंत्री योजना भारतात पाठविली.त्रिमंत्री योजनेतील सदस्यांनी डॉ. आंबेडकरांपुढे मोठा पेचप्रसंग निर्माण केला.डॉ.आंबेडकरांना तुम्ही मजुरांचे नेते की अस्पृश्यांचे नेते अशा कात्रीत पकडण्याचा प्रयत्न करताच डॉ.आंबेडकरांनी अखिल भारतीय अनुसूचित जाती संघाची स्थापना करून मी कामगारांबरोबर अनुसूचित जाती संघाचाही नेता असल्याचे स्पष्ट केले.

**कामगार कल्याणाची कार्ये** :—डॉ.आंबेडकरांनी नागपूरला अखिल भारतीय अनुसूचित जाती संघाचे तीन दवसीय अधिवेशन घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली.अशातच डॉ. आंबेडकरांची इंग्रजी प्रशासनात मजूरमंत्री म्हणून नियुक्ती झाली.या कार्यकाळात त्यांनी कामगार कल्याणाची अनेक कार्ये केली.मजुरांच्या कामाचे तास बारा तासावरून आठ करण्यात आले.मध्यंतरी जवनाकरिता काही काळाची व्यवस्था केली.काम करतांना कर्मचा—यांचा अपघात झाल्यास त्याच्या विम्याची व्यवस्था केली.रात्रीपाळीवर महिलांना कामावर घेण्यास मज्जाव करण्यात आला.स्त्रियांना प्रसुती रजा मंजूर करवून घेतल्या.दर दहा वर्षांनी वेतन आयोग स्थापन करण्याची सोय केली.वर्षातून दोनदा डी.ए.वाढविण्यात यावा याची व्यवस्था केली. ऐवढेच नव्हे तर सेवा निवृत्ती नंतर कर्मचा—यांना योग्य तो मोबदला (पेंशन)दिला जावा अशी तरतूद केली.

**जल व विद्युत नियोजनावर भरीव काम** :—इंग्रजी राजवटित मजूरमंत्री म्हणून त्यांनी जल व विद्युत नियोजनावर भरीव काम केले.भविष्यातील विद्युत तुटवडा विचारात घेऊन त्यांनी नदी जोडो प्रकल्प राबवून कृषीकरिता पाणी आणि विद्युत निर्मितीला प्रोत्साहन दिले.कोळसा वापरून वीज निर्मिती करणे भारताला परवडनारे नाही म्हणून त्यांनी पाण्यावरून विद्युत निर्मितीला विशेष महत्व दिले.डॉ.आंबेडकरांनी भाक्रा नानगल,हिराकुंड दामोदर व्हॅली प्रकल्प यासारखे अनेक धरणे बांधून भविष्यातील विद्युत तुटवडा आणि हरित क्रांतीचे स्वप्न पाहले होते.पुढे नेहरू सरकारने या दिशेने आणि नंतर येणा—या सरकारांनी जल व विद्युत नियोजनाचे महत्व जणले असते तर आज ज्या शेतक—यांच्या आत्महत्या होत आहेत कदाचित त्या आज झाल्या नसत्या कारण आत्महत्या त्याच प्रदेशात मोठया प्रमाणावर केल्या जातात जिथे कोरडवाहू शेती केली जाते.



Scanned with CamScanner

आज भारतासमोरील अनेक आव्हानांपैकी विद्युत तुटवडा हा प्रश्न गंभीर रूप धारण करीत आहेत.अनेक राज्यांमध्ये लोडसेडिंग करण्यात येते. उद्योगांना बरोबर वीज पुरवठा केला जात नाही.लोडशेडिंगमुळे शेतकरी आपल्या ओलिताखालील जमिनीला पाणी देऊ शकत नाही.

**संविधानाचे शिल्पकार** : १९४६ च्या सुरवातीला सत्ता हस्तांतराची प्रकिया सुरू झाली. इंग्लडच्या प्रधानमंत्र्याने भारतीयांना अल्टिमेशन दिले की, जून १९४८ पर्यत इंग्रज भारतीयांच्या हातात सत्ता सोपवून निघून जातील.तेव्हा भारतात हंगामी सरकारची स्थापना करण्यात येऊन संविधान निर्मितीच्या प्रकियेला सुरुवात झाली.मुस्लीम लिगने स्वतंत्र मुस्लीम राष्ट्राकरिता प्रत्यंक्ष कृती दिन साजरा केला.संविधान समितीला असहकार्य केले. डॉ.आंबेडकरांनी आपले परम विश्वासू कार्यकर्ते श्री.जोगेंद्रनाथ मंडल यांच्या मदतीने बंगाल प्रांतातून निवडणुकीला उभे राहून संविधान सभेवर निवडून गेले. संविधानसभेतील राष्ट्रिय एकात्मतेवरील त्यांच्या भाषणाने प्रभावित होऊन काँग्रेसमधील अनेक दिग्गज नेत्यांनी डॉ.आंबेडकरांची मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्तीला मान्यता दिली.मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून संविधानाचा कच्चा मसुदा आपले एक सहकारी बी.एन.राव. यांच्या मदतीने त्यांनी समर्थपने पूर्ण केले.डॉ.आंबेडकर भारतीय संविधानाचे शिल्पकार ठरले.भारताचे संविधान जगातील सर्वोत्कृष्ठ संविधान आहे.भारताला स्वातंत्र मिळून एवढी वर्षे झाली असली तरी भारतातील विविध समाज गटांना सोबत घेऊन भारत परकीय संकटांचा सामना करीत विकासाच्या दिशेने मार्गक्रमण करीत आहे तर आपल्या बाजूच्या पाकिस्तानात आतापर्यत कित्येकदा लष्करी राजवटी लागलेल्या आहेत हे विसरता येणार नाही. भारतातील विविध समाज गटांच्या मूलभूत हक्क व अधिकारांचे संरक्षण करण्यात आणि राष्ट्राची एकता व अखंडता कायम ठेवण्यात भारतीय लोकशाही परिपक्व होत आहेत; ते केवळ सशक्त भारतीय संविधानामुळे हे विसरता येणार नाही.

दरम्यानच्याच काळात संस्थानिकांचे विलिनीकरण करून एकसंघ भारत निर्माण करण्याचे कार्य सरदार पटेल करीत असतांना त्यांना हैद्राबाद राज्यावर लष्करी कार्यवाही नाही तर पोलिस कार्यवाही करण्याच्या महत्वपूर्ण सल्ला डॉ.आंबेडकरांनी दिला.हैद्रबाद राज्याच्या विलिनीकरणात डॉ. आंबेडकरांचे मोठे योगदान राहिले आहे.याचकाळात डॉ.आंबेडकरांनी सिद्धार्थ व मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली.

**हिंदू कोड बिल** :—हजारो वर्षे ज्या पुरुषप्रधान समाज व्यवस्थेने स्त्री व शूद्रांची अवहेलना केली होती त्यातून स्त्रियांना मुक्त करण्यासाठी डॉ.आंबेडकरांनी समान नागरी कायद्याच्या अंतर्गत हिंदू कोड बिल तयार करून स्त्रिमुक्ती स्वातंत्र्याचा या बिलाच्या रूपाने जाहीरनामा मांडला या कायद्यानुसार स्त्रियांना पुरुषाबरोबरचे अधिकार देण्यात



Scanned with CamScanner

आले होते.वडिलोपार्जित संपत्तीत स्त्रीला वाटा देण्यात आला.घटस्फोट घेण्याचा हक्क देण्यात आला.पोडगीचा हक्क मागण्याचा अधिकार देण्यात आला. दत्तक व वारस नियुक्त करण्याचा हक्क देण्यात आला; परंतु सनातन्यांच्या विरोधामुळे हे बिल पास होऊ शकले नाही; तेव्हा संतप्त होऊन त्यांनी कायदामंत्री पदाचा राजीनामा दिला.या राजीनाम्याकरिता आणखीही काही कारणे होती त्यातील मुख्य म्हणजे ओ.बी.सी. हे कोण? या ओळखीकरिता स्थापन करावयाचा आयोग स्थापन करण्यात दिरंगाई करणे आणि नेहरू सरकारच्या विदेश नीतीवर ते नाराज होते.कारण भारत हे लोकशाही राष्ट्र असून इंग्लड,अमेरिकेशी जवळीक न करता नेहरू सरकार साम्राज्यवादी सोव्हियत रशियाच्या जवळ जात होते.पुढे रशियाचे विघटन झाल्याने डॉ. आंबेडकरांनी दिलेला इसारा खरा झाला आणि आपन अमेरिकेसारख्या लोकशाही राष्ट्रांच्या मित्रत्वापासून दूर राहिलो.अमेरिकेने आपल्या विरोधात पाकिस्तानला आपल्या गटात घेतले.

**धर्मांतर** :–डॉ. आंबेडकरांचे सर्वात विधायक कार्य म्हणजे स्पृश्य हिंदूच्या बरोबरीने अस्पृश्यांनाही समतेचे अधिकार देण्यात यावे हया अस्पृश्यांबद्दलच्या भूमिकेमध्ये ऐवढ्या विनंत्या, अर्ज आणि जनआंदोलने केल्यानंतरही काहीच बदल न घडून आल्यामुळे शेवटी राष्ट्रीय एकात्मतेचा विचार लक्षात घेऊन आणि गडगंज संपत्तीचे ढिगारे घेऊन इतर धर्मीय उभे असतांनाही बौद्ध धम्माच्या चरणी स्थिरावले. त्यांनी इस्लाम किंवा ख्रिश्चन धर्म स्वीकारून भारत देशाचे वाटोळे ते सहज करू शकले असते; परंतु त्यांना देशविघातक म्हणून स्वत:च्या नावाची नोंद इतिहासात करून घ्यावयाची नव्हती.

जगाच्या इतिहासात एकाच वेळी पाच लाख लोकांनी धर्मांतर करण्याची ही एकमेव घटना आहे.ही धम्मक्रांती सुयोगाने आपल्या नागपूर शहरी १४ आक्टोंबर १९५६ ला झाली.या क्रांतीने अस्पृश्यांच्या जीवनात क्रांतीकारक बदल घडवून आनले आहेत. अस्पृश्य समाजाने गेल्या साठ वर्षांत जी कमालीची प्रगती करून दाखविली आहे. साठ वर्षापूर्वी हाच समाज कुत्र्या,मांजरापेक्षाही नित्कृष्ठ प्रतीचे जीवन जगत असून उकिरडयावरील फेकलेल्या पत्रावळीवरील खरकटे खाण्यासाठी आपसात भांडणारा हा समाज आज जीवनाच्या प्रत्येक श्रेत्रात पुढे वाटचाल करतो आहे.याचे कारण म्हणजे त्यांनी या समाजाला दिलेला बौद्ध धम्मरूपी बाळकडू होय. संपूर्ण भारत बौद्धमय करण्याचे त्यांचे स्वप्न होते. जगात आजही भारताची ओळख बौद्ध धर्मीय राष्ट्र म्हणूनच आहे.आपले राजचिन्ह, मुद्रा, ध्वज आणि अनेक पुरस्कार हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. परंतु लवकरच त्यांचे महापरिनिर्वाण झाल्याने रिपब्लिकन पक्षाची संकल्पना ते प्रत्यक्षात कार्यान्वित करू शकले नाही.

डॉ. आंबेडकरांना कोणताही राजकीय वारसा नसतांनाही शून्यातून ऐवढे अफाट कार्य



Scanned with CamScanner

मानवमुक्तीसाठी करून दाखविले. अशा या महामानवाचे २०१६ हे वर्ष संपूर्ण भारतभर शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. केंद्र सरकार आणि राज्यसरकार संपूर्ण वर्षभर हा उपक्रम राबवित आहेत. अनेक विद्यापीठानेही परिपत्रक काढून महाविद्यालयीन स्थरावर विविध कार्यक्रम घेण्याचे परिपत्रक पाठविले आहे. हे सर्व पाहून आता ख–या अर्थाने बाबासाहेब डॉ. आंबेडकरांचे कार्य भारतीयांना कळत असल्याचे पाहून मन आनंदित होत आहे. बाबासाहेब डॉ. आंबेडकर यांचा जयंती समारोह संयुक्त राष्ट्रसंघाच्या वतीने साजरा झाल्याचे पाहून मन प्रफुल्लित होते आहे. सत्य हे पृथ्वीच्या पोटातून बाहेर येऊन वास्तवाचे दर्शन घडविते या म्हणीची आणखी एकदा प्रचिती आली.

******



Scanned with CamScanner

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर, संत गाडगे बाबा विद्यापीठ
अमरावती व गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

## इतिहास परिषद अधिवेशन - ५० वे

# निवडक शोध निबंध

## खंड अठरावा

(२०१७-२०१८)

संपादक
डॉ. शरद बेलोरकर

Scanned with CamScanner

१४) जननायक तंट्या–भिल्ल कालखंड– १८४२–१८९०.............७०
प्रा. योगीता महादेव गावंडे
१५) नागपूर जिल्ह्याच्या उत्तरेकडील ऐतिहासिक पर्यटन स्थळे........७४
प्रा. प्रमोद चौव्हाण
१६) नागपूर जिल्ह्याच्या उत्तरेकडील ऐतिहासिक पर्यटन स्थळे.......७८
डॉ. प्रशांत प्र. कोठे
१७) इतिहासलेखनातील कार्यकारणभाव..................................८३
प्रा. डॉ. महेंद्र गायकवाड,
१८) सानगडी येथील किल्ला: एक ऐतिहासिक अवलोकन..........९४
प्रा. डॉ. राजेंद्र खंडाईत
१९) मा. कांशीरामजींच्या नेतृत्वात महाराष्ट्रातील बहुजन समाज पक्षाचे कार्य..................................................................९९
प्रा. किशोर शेषराव चौरे
२०) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार................१२०
प्रा. राजु भा. खरडे
२१) माहुरची वाघीण 'रायबागण'......................................१२८
प्रा. डॉ. मंगला गोरे
२२) प्रागैतिहासिक काल से लौह युग तक की समाधियों मे दफन प्राणी अवशेषों पर प्रकाश..............................................१३२
अक्षय मनोहर माटे
२३) प्राचीन भारतीय सिक्कोपर कुषाण काल से मराठा काल तक शिव स्वरूपो का अंकन..................................................१३६
कु. शैलास ओमप्रकाश भक्ते
ऋषभ हेडाऊ
२४) प्राचीन भारत मे शिल्पकारों का सामाजिक जीवन...........१४०
प्रा. अशोक दौलतराव गेडाम
25) "Sculpture of Maurya period in India"..............................147
26) Condition of Indians and Gandhiji's Satyagraha In South Africa..........................................................................151
Dr. Anjali Andrew

Scanned with CamScanner

# इतिहासलेखनातील कार्यकारणभाव

इतिहासाला जर शास्त्राचा दर्जा मिळवून द्यायचा असेल तर ज्याप्रमाणे शास्त्रांमध्ये कार्यकारणभाव प्रस्थापित केला जातो. तद्वतच इतिहासामध्येसुद्धा कार्यकारणभाव प्रस्तापित केला जावा अशी रास्त अपेक्षा इतिहासकाराकडून केली जाते. इतिहासात नुसतेच काय आणि कसे घडले? हे सांगून अर्थ नाही तर ते का घडले? यांच्या स्पष्टीकरणाने इतिहासलेखन अर्थपूर्ण होत असते. डॉ. शांता कोठेकर लिहितात, "कारणमिमांसेमुळे घटना अर्थपूर्ण बनतात, घटनांचे आकलन समर्पकपणे होते एरवी कारणमिमांसेखेरिज झालेले इतिहासलेखन म्हणजे घटनांची जंत्री ठरते."

कारणमिमांसा हा इतिहासाचा आत्मा असून त्याखेरिज इतिहास अर्थपूर्ण होत नाही. इतिहासकाराला घटनेमागील कारणांचा शोध घेणे आवश्यक असते. ऐतिहासिक घटना कार्यकारण प्रक्रियेच्या धाग्याने बांधलेल्या असाव्या लागतात. ऐतिहासिक घटना का घडली? याचे स्पष्टीकरण देण्यासाठी कार्यकारणभाव प्रस्तापित केला पाहिजे. कारण हे मानवी विचार व मनोव्यवहाराचे निदर्शक असते. कारणांच्या प्रभावाचा घटनेच्या परिणामाशी संबंध असतो. कारण ही संकल्पना कार्य घडविणारी महत्त्वाची प्रक्रिया आहे. त्यामुळे इतिहासकाराने, "प्रत्येक घटना चिकित्सकपने निरखून व पारखून घेतली पाहिजे तसेच त्यांच्यातील कारणपरंपरा प्रस्तापित करून दाखविली पाहिजे."[२]

इतिहासकाराने एखादी घटना का घडली? याचा खुलासा म्हणजे घटनेचे कारण दिले पाहिजे. हिरोडोटपासून अनेक इतिहासकारांना सत्य शोधण्यासाठी कारणांची आवश्यकता भासत आली आहे. ऐतिहासिक कार्यकारणभावाविषयी डॉ. प्रभाकर गंद्रे लिहितात की, "भूतकालीन घटनांच्या विविध कारणांचा शोध घेऊन त्यांच्या परिणामांची व्याख्या इतिहास होय. इतिहासकानर वर्तमानाच्या संदर्भात इतिहास सादर करतो हे सादरीकरणच कारणाचे सादरीकरण आहे. तेच कोणत्याही घटनाचे कारण व कार्य आहे."[३]



Scanned with CamScanner

इतिहासलेखनशास्त्रात कारणमिमांसा उच्च दर्जाच्या इतिहास लेखनाचे लक्षण मानल्या जावू लागले आहे. कारणमिमांसेखेरिज इतिहास निर्जिव ठरतो. प्रत्येक घटनेमागे कारण असते. त्या घटनेचे परिणाम म्हणजे पुढे घडणाऱ्या घटनेचे कारण असते. अशी कारण परिणामाची कडी तयार होते आणि अशी एक-एक कडी जुळवत गेले की, घटनांचा अन्वयार्थ लागतो. अन्यथा इतिहासलेखन नीरस बनते. त्यामुळेच डॉ. बी.एन. सरदेसाई लिहितात, ‘‘इतिहासामध्ये सत्याकडे जाण्याचा मार्ग कार्यकारणाभावाच्या वाटेवरून जात असतो.’’[४]

## १) कार्यकारणभाव म्हणजे काय?

इतिहासात घटनांचा अभ्यास केला जातो. ऐतिहासिक घटनांचे स्पष्टीकरण करतांना अनेक कारणे दिली जातात कारण हे घटनेचे स्पष्टीकरण असते. कारण म्हणजे घटना किंवा प्रसंगाचे अंतस्थ तार्किक स्वरूप होय. घटना कशी घडली हे सिद्ध करण्यासाठी कार्यकारणभाव प्रस्थापित केली जातो. इतिहासकाराने एखादी घटना का घडली? त्या कारणांचा शोध घेऊन नेमके कारण सांगितले पाहिजे त्यामुळे घटनांना अन्वयार्थ प्राप्त होतो. एखादी घटना कशी घडली? हे सिद्ध करण्यासाठी कार्यकारणभाव प्रस्तापित केला जातो. प्रा. गफुर शेख लिहितात, ‘‘घटना आणि परिणाम यांच्या संबंधाच्या नियमास कार्यकारणभाव असे म्हणतात.’’[५]

इतिहासाला प्रत्येक कृतिमागील, घटनेमागील कारणांचा शोध घ्यावयाचा असतो. यालाच घटनांची कारणमिमांसा म्हणायचे. कारणमिमांसा ही कारणांचा शोध घेण्याची प्रक्रिया आहे. इतिहासकाराने असे का घडले? या प्रश्नांचे उत्तर उलगडून दाखविने म्हणजे इतिहासातील कार्यकारणभाव होय. प्रा. गायकवाड डॉ. सरदेसाई आणि प्रा. हनमाने लिहितात की, ‘‘इतिहासात घटनांचा अभ्यास करावयाचा असतो. या घटना म्हणजे अनेक धागे आहेत अशी जर कल्पना केली तर हे सर्व धागे एकत्र करून त्याचे वस्त्र तयार करण्यासाठी मध्ये जे धागे वापरावे लागतील त्या धाग्यांना कारण असे म्हणावे लागेल.’’[६]

इतिहासलेखनशास्त्रातील कार्यकारणभाव म्हणजे काय? हे समजण्यासाठी आपण एक उदाहरण पाहू या.

उदा. दुधाच्या भांड्यावरील झाकन हलण्याची अनेक कारणे असतात. दुधामध्ये उकळण्याचा गुणधर्म असतो. हे कारण शास्त्रीय कसोटीवर टिकू शकत नाही. कारण



Scanned with CamScanner

इतर पदार्थातही उकळण्याचा गुणधर्म असतो. भांड्याला जाळ लागला. त्यामुळे दूध तापले. दुधावर झाकन असल्यामुळे वाफ तयार झाली. वाफेच्या शक्तीमुळे झाकन हलू लागले. म्हणजे हलने हा दुधाचाही गुणधर्म नाही किंवा झाकणाचाही गुणधर्म नाही तर वाफेच्या शक्तिचा तो एक आविष्कार आहे तेव्हा आपण असे म्हणू की वाफेमुळे झाकन हालते तेव्हा त्या घटनेमागिल कार्यकारणभाव प्रस्तापित होतो.

ग्रिक इतिहासकार हिरोडोटसही कार्यकारणभावाला महत्त्वाचे मानतो. मॉन्टेस्क्युने पहिल्यांदा कार्यकारणभावासंबंधी चर्चा केली. ऐतिहासिक घटना कारणपरंपरेमध्ये दाखविता येतात असा विचार त्यांनी मांडला. यानंतर इतिहासकारांनी गतकाळाचे ज्ञान कोणत्या प्रक्रियेमध्ये बसविता येईल. याविषयी विचार मंथन करून गतकालीन घटना या कार्यकारणभाव आणि नियम यांच्या आधारावर मांडता येईल या निष्कर्षावर पोहचलेत. इतिहासकार एकाचवेळी अनेक कारणांची परंपरा देण्यास समर्थ असेलच असे नाही म्हणून प्रत्येक इतिहासकार आपल्या पात्रतेनुसार कारणांचा अभ्यास करतो. त्यामुळे ती वैयक्तिक स्वरूपाची असते. इतिहासकाराच्या नजरेसमोर कारण असतात. त्यापैकी कोणते किती महत्त्वाचे ही क्रमवारी ठरविण्यामध्येच इतिहासकाराचे श्रेष्ठत्व असते. ऐतिहासिक कार्यकारणभाव हा व्यक्तिसापेक्ष असते कारण एकाच घटनेची अनेक कारणे असतात. ती पाहणाऱ्यावर अवलंबून असतात. प्रा. गायकवाड, डॉ. सरदेसाई आणि प्रा. हनमाने लिहितात की, ''कार्यकारणभाव ही इतिहासामध्ये इतकी आवश्यक व गरजेची बाब आहे की, ती इतिहासापासून वेगळी करता येत नाही. जणू काही ती इतिहासाची एक उपशाखाच आहे. कार्यकारणभावावचे साधन इतिहासकाराच्या हातात असणे फार आवश्यक आहेत.''

साधारणतः ऐतिहासिक घटनेचा अर्थ हा जास्तीत जास्त महत्त्वाच्या कारणांच्या संदर्भातच लावला जातो. कार्यकारणभाव प्रस्तापित करतांना भावनेच्या आहारी जाऊन अशास्त्रीय पद्धतीने कोणतीही कारणे जोडण्याचा प्रयत्न करू नये. इतिहासकाराने कारणांचा उपयोग ऐतिहासिक घटना योग्य शब्दांत मांडण्यासाठी असतो हे विसरता कामा नये. प्रो. कार्ल गुस्टावसन म्हणतात की, अनेक घटनांचा एक परिणाम असतो व अशा अनेक स्पष्टीकरणातून ऐतिहासिक प्रसंगाचे वर्णन करता येते. ऐतिहासिक घटनेचे स्पष्टीकरण एकच कारण पुरेसे देऊ शकत नाही.

### २) इतिहासकार घटनांचे स्पष्टीकरण कसे करतात?

इतिहासकार घटनांचे अनेक मार्गानी स्पष्टीकरण देत असतो. अशा स्पष्टीकरणामध्ये



Scanned with CamScanner

इतिहासकार ज्या तत्वज्ञानाचा प्रभाव पडलेला असतो. त्यानुसार तो स्पष्टीकरण करीत असतो. बऱ्यावेळा इतिहासकार घटनेचे स्पष्टीकरण देण्यासाठी जे अनेक शब्द वापरतात. त्यामुळे पारिभाषिक शब्दचा गोंधळ उडण्याची शक्यता आहे, परंतु तसा गोंधळ होण्याचे कारण नाही. कारण प्रत्येकाला कार्यकारणभाव हाच जोडून दाखवायचा असतो फक्त तो शब्द वेगळे वापरतो.

टेनने स्पष्टीकरणाचा सिद्धांत मांडला आहे. तो म्हणतो की, ही गोष्ट सर्वश्रृत आहे की, एक घटना दुसऱ्या घटनेशी कारण म्हणून जेव्हा जोडली जाते तेव्हा कारणे व परिणाम यांची एक साखळी तयार होते. अशी साखळी तयार झाल्यानंतर आपल्याला असे वाटते की, आपण एका नव्या पद्धतीची सुरूवात केली आहे. परंतु आपण कारणे कोणत्या गोष्टीने जोडली जातात हे शोधन काढू शकत नाही.

कारणांची संगतवार मांडणी करतांना घटनेच्या जवळच्या कारणालाच महत्त्वाचे मानले जाते किंवा एखाद्या घटनेचे श्रेय एखाद्या व्यक्तीला दिले जाते तसेच त्याचा दोष एखाद्या व्यक्तिच्या पदरी बांधला जातो. अशा मंडळीला अतिसुलभीकरण असे म्हणतात. कोणत्याही घटनेमागे अनेक कारणे असतात. घटनेच्या अंतर्भागात शिरून शोध घेणे श्रेष्ठ इतिहासकाराचे लक्षण आहे. ऐतिहासिक घटनांचे स्पष्टीकरण करतांना महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांमागे कारणांची दीर्घकालीन परंपरा असते हे लक्षात आले तर घटनांचा अर्थ लावता येतो त्यामुळे बहुविध कारणांचा शोध घेणे उच्च दर्जाच्या इतिहासकाराचे लक्षण मानले जाते. ऐतिहासिक कारणे विपुल व समृद्ध असतात.

**३) ऐतिहासिक कारणांचा शोध घेतांना विचारात घ्यावयाच्या बाबी:**

ऐतिहासिक कारणांचा शोध घेतांना ध्यानात घ्यावयाच्या बाबींविषयी डॉ. शांता कोढेकर लिहितात की, "पहिला मुद्दा असा की, कोणतीही मानवी कृती कारणाशिवाय घडत नाही, प्रत्येक घटनेमागे कृतीमागे मग ती कितीही मोठी अगर शुल्लक असो, जाणिव पूर्वक केलेली असो वा अजानता केलेली असो, त्यामागे कारण असते."[८]

ऐतिहासिक कारणांचा शोध घेतांना मोठ्या महत्त्वाच्या घटनांच्या मागे एकच नव्हे तर अनेक कारणे असतात हे विसरता येत नाही. केवळ एका कारणाच्या निर्देशाने घटनेमागील कारणांचा बोध होत नाही. संशोधकाच्या हाती आलेली कारणे सारख्याच महत्त्वाची नसतात. काही कारणे महत्त्वाची तर काही गौण आहेत. हा निर्णय इतिहासकारास करायचा असतो. इतिहासकाराच्या हाती कारणे आले की त्याची वर्गवारी ठरवावी



Scanned with CamScanner

लागत. कारणाची जुळवणूक करतांना ती तर्कसंगत असतील तरच त्यातून तर्कशुद्ध निष्कर्ष निघू शकतो.

**प्रा. कार्ल गुस्टावसन** यांनी कारणांचा शोध घेतांना विचारात घ्यावयाच्या बाबी सांगितल्या आहेत.

१) घटनेचे/कृतीमागील जवळचे कारण कोणते?

२) त्यामागे वैचारिक भूमिका आढळते काय?

३) त्या वैचारिक भुमिकेचे प्रत्यंतर त्यापूर्वी आढळते काय?

४) त्या घटनेशी कोणकोणत्या व्यक्ती संबंधित आहेत? त्या एकाच गटातील की भिन्न गटातील आहेत

५) त्यांची शक्तिस्थळे अगद दौर्बल्य कशात होत? त्याचा ऐतिहासिक घटनेशी संबंध दिसतो का?

६) त्या घटनेबाबत समाजातील भिन्न घटकांची काय प्रतिक्रिया होती?

७) त्या घटनेपूर्वी काही लक्षणिय असे राजकीय स्वरूपाचे अथवा तंत्रज्ञानात बदल झाले होते काय?

८) त्या घटनास्थळाची भौगोलिक स्थिती काय होती?

९) तत्कालीन भिन्न क्षेत्रातील संस्थांशी त्या घटनेचा संबंध होता का? या प्रश्नांचे उत्तरे शोधल्यास सर्व कारणांचा शोध घेतला जाईल याविषयी शंका नाही.

### ४) कार्यकारणपरंपरेतील समस्याः

इतिहासामध्ये कार्यपरंपरा देता येते काय? अशी समस्या निर्माण होते. केनिथ स्टॅम्प म्हणतो की, गणितातील अचुकपणा इतिहासामध्ये कधीही येणे शक्य नाही. इतिहासकार ज्यावेळी काही निष्कर्ष काढतो तेव्हा त्याच्या जवळचे पुरावे हे अतिशय तुटपुंजे, मानवी स्वभावाची कमी माहिती, तसेच ऐतिहासिक घटना वेगळ्या करून पाहण्याची क्षमता कमी असते. इतिहासकाराने निष्कर्ष काढीत असतांना प्रयोगात्मक पद्धतीने सांगावेत कारण ही संकल्पना इतकी विशाल आहे की स्थल आणि काल यांच्या चौकटीत बसवितस येणार नाही. म्हणून एखाद्या घटनेमागील कार्यकारणभाव प्रस्थापित करणे ही एक समस्याच आहे. प्रो. जी.जे. रेनियर म्हणतात की, "जर आपण कारणाला गृहितकृत्य म्हटले तर काही लोकांचा असा समज होण्याची शक्यता आहे की ऐतिहासिक कारणावरून भवितव्य वर्तविता येईल."[१]



Scanned with CamScanner

**प्रो. वाल्श म्हणतात की,** इतिहासकारांना विषय मांडणीसाठी कोणती कारणे स्वीकारण्याची यासंबंधी निश्चित माहिती नसते. त्यामुळे त्यांचा गोंधळ होतो. इतिहासकारामध्ये घटनेच्या कार्यकारणभावामध्येच अनेकदा एकमत होत नाही. डॉ. बी.एन. सरदेसाई लिहितात. की, "कारणे शोधत असतांना योग्य घटना घेतल्या पाहिजेत व त्यामधून तार्किकदृष्ट्या योग्य कारणे स्वीकारली पाहिजेत या कारण निवड प्रक्रियेमध्ये वस्तुनिष्ठता महत्त्वाची आहे."[१०]

**प्रो. कोहेन म्हणतात,** "कारणपरंपरा म्हणजे एखादी घटना घडत असतांना जी आवश्यक व पुरेशी परिस्थिती असते त्याचे दिग्दर्शन करणारी संकल्पना होय. प्रत्यक्षार्थवादी लोकांच्या म्हणण्यानुसार जरी जरूर ती व पुरेशी परिस्थिती असे म्हटले असले तरी कोणती परिस्थिती ही जरूर व पुरेशी हे ठरविणे अवघड आहे. कोणताही इतिहासकार संपूर्ण परिस्थिती उभी करू शकणार नाही. म्हणून कार्यकारण ही एक समस्याच आहे.

**प्रो. आर.जी.कर्लिंगवुडच्या मते,** ऐतिहासिक कारण ही संकल्पना मानवी जीवनाशी निगडीत असते. कारण हे कधीही एकमेव असत नाही. अनेक विध परिस्थितीतून कारणे निर्माण होत असतात. कारण ही संकल्पना कार्य घडविणारी एक प्रक्रिया आहे. कारण यामागे मानवी मन ही संकल्पना अतिशय महत्त्वाची आहे. कोणत्याही घटनेचे हे कारण हे संशोधकाच्या विचारसरणीचे, मनोव्यवहाराचे निदर्शक असते. म्हणूनच इतिहासामध्ये वस्तुनिष्ठ कारणाची समस्या निर्माण होते. वस्तुनिष्ठ कारणाच्या समस्येविषयी गायकवाड, सरदेसाई डॉ. बि.एन.व हनमाने लिहितात की, "कारणपरंपरेमध्ये वस्तुनिष्ठता हा एक महत्त्वाचा भाग आहे. कारणे शोधत असतांना सर्वच कारणे वस्तुनिष्ठ असतील असे सांगता येत नाही काही वेळा एकाला वस्तुनिष्ठ वाटणारी कारणे दुसऱ्याला व्यक्तिनिष्ठ वाटू शकतील."[११] कारणाच्या वस्तुनिष्ठतेविषयी असे म्हणता येईल की, दोन कारणांमध्ये जरूर तो संबंध प्रस्तापित करून कारण व परिणाम हे सिद्ध करता आले पाहिजेत.

५) **कार्यकारणपरंपरेचे सिद्धांतः** इतिहासलेखनशास्त्रातील कार्यकारणपरंपरेचे पुढील सिद्धांत आहेत.

**अ) गुप्ततेचा सिद्धांतः** गुप्ततेच्या सिद्धांतामध्ये त्यातील शिर्षकाला अनुरोधूनच अशा घटना व कारणे शोधून काढलेली असतात की, ती सर्व कारणे व



Scanned with CamScanner

घटना गुप्त असतात. उघड असत नाहीत हा सिद्धांत अमेरिकन यादवी युद्धाच्या वेळी प्रसिद्ध होता. यात उत्तरेच्या व दक्षिणेच्या इतिहासकारांनी एकमेकांवर टीका करून आपला खरा हेतू लपवण्याचा प्रयत्न केला आहे. दोन्ही बाजू एकमेकांना आक्रमक म्हणतात. त्यामुळे खरा आक्रमक कोण? हा प्रश्न शिल्लकच राहतो गुप्ततेचा सिद्धतांचे समर्थक या संकल्पनेच्या मुल्यमापनाच्या कसोटीवर निष्कर्ष काढण्यास तयार नसतात. अशा सिद्धांतामधील सर्व घटना या उघडपणे न देता अंतर्भूत अशा स्वरूपाच्या असतात.

**ब) संघर्षाचा सिद्धांतः** अमेरिकन यादवी युद्धानंतर इतिहासकाराचे दोन पक्ष तयार झाले. दोन्ही पक्ष एकाच घटनेचा अन्वयार्थ स्वतंत्रपणे लावू लागले. दोन्ही पक्षात वैचारिक संघर्ष सुरू झाला. यातूनच संघर्षाचा सिद्धांत निर्माण झाला. उत्तरेकडील इतिहासकार घटनांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करू लागले. तर दक्षिणेकडील इतिहासकार परिस्थितीला दोष देऊ लागले. त्यामुळे दोन भिन्न विचारसरणी असणारी संस्थाने एकत्र राहणे शक्य नव्हते त्यातून युद्ध हा एकच पर्याय होता. अलिकडच्या इतिहासकारांनी सुद्धा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून इतिहास लिहिला. दृष्टिकोणातील हा संघर्ष कोणत्या न कोणत्या परिस्थितीत अस्तित्वात असतोच.

**क) समन्वयाचा सिद्धांतः** अमेरिकन यादवी युद्धाविषयी उत्तरेकडील व दक्षिणेकडील इतिहासकारांनी यादवी युद्धाचे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून जे सिद्धांत मांडले या लेखनाविरूद्ध या सिद्धांताविरूद्ध आवाज उठवून काही इतिहासकारांनी ते स्वतंत्र सिद्धांत मांडला त्या सिद्धांतालाच आवर्तनिय सिद्धांत असे म्हणतात. या सिद्धांतानुसार पहिल्या दोन्ही सिद्धांतामधील एकाकीपणा काढून टाकून कोणत्याही पक्षाला दोष न देता घडलेल्या सर्व घटना व त्याचा अन्वयार्थ मानवजातीच्या हिताच्या दृष्टिने लावण्याचा प्रयत्न केला. पूर्वीच्या दृष्टिकोनातील संघर्ष समाप्त करावयाचा होता. यादवी युद्धात ज्यांनी समन्वयकाची भूमिका घेतली ते पुढारी खरे नायक म्हणून वर्णन करण्यात आले. या समन्वयवादी सिद्धांताने अमेरिकेतील संघर्षाचे वातावरण कमी करण्यास मदत झाली.

**ड) दैवी योजनेचा सिद्धांतः** इतिहासात ज्या घटना घडतात त्यांच्या मुळाशी दैवी प्रेरणा असते. देव हाच इतिहासात घटना घडवून आणत असतो. या दैववादी सिद्धांतावर इजिप्शियन, बॅबिलोनियन व ग्रिक इतिहासकारांचा विश्वास होता. दैवी सिद्धांतानुसार दैवात लिहिलेल्या गोष्टी प्रत्यक्षात आणण्याचे काम श्रेष्ठ योद्धे, धर्मगुरू व राजा पार पाडित असत ही सर्व मानसे देवाचे प्रतिनिधी म्हणून पृथ्वीवर काम



Scanned with CamScanner

करीत असत. अर्थातच अशाप्रकारे दैवी कल्पनांचा मानवी हालचालीशी संबंध जोडल्यामुळे कार्यकारणभावात दैवी प्रेरणा शोधण्याची प्रवृत्ती निर्माण झाली.

**इ) बुद्धीवादी सिद्धांतः** युरोपात प्रबोधन युग सुरू झाले. जुन्या समजुती दूर होऊन प्रत्येक घटना बुद्धीवादाच्या कसोटीवर पारखण्याची प्रक्रिया सुरू झाली. ही प्रक्रिया समाजशास्त्रात लागू करण्यात आली. बुद्धीवादावर प्रत्येक घटना पारखून पाहिल्यामुळे आध्यात्मिक व आत्मिक स्वरूपाचे ज्ञान ही कल्पना किंवा आत्मिक प्रभाव हा प्रत्येक घटनेच्या मागे असतो ही कल्पना मागे पडली. प्रत्येक घटना ही कार्यकारण प्रक्रियेतून तपासून पाहण्याची पद्धत सुरू झाली. प्रत्येक घटनेच्या पाठीमागे सबळ कारण असते व ते शोधण्याची पद्धत सुरू झाली.

**ई) राष्ट्रीय व्यक्तिमत्त्वाचा सिद्धांतः** १९ व्या शतकात युरोपात राष्ट्रवादाची कल्पना उदयास आली. स्वतःच्या राष्ट्राविषयी बलिदान करण्याची मनाची तयारी म्हणजे राष्ट्रवाद होय. प्रत्येक घटनेचे स्पष्टीकरण देत असतांना राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व कसे चांगल्या चांगले घडविले जाईल या हेतूने कार्यकारण परंपरा यांच्यात संबंध प्रस्थापित करण्यात येऊ लागले. परिणामी राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी इतिहास लिहिण्याची पद्धत सुरू झाली. इतिहास घडविणाऱ्या व्यक्तींना राष्ट्रपुरूष म्हटल्या जावू लागले.

**फ) मानवी भावनांचा सिद्धांतः** हेगेल, कॉम्त व सायमन या तिघांनी ऐतिहासिक घटनांच्या पाठिमागे मानवी भावना असतात या भावनांमधूनच राष्ट्राचे भवितव्य ठरविले जाते असे विचार मांडले. मानवी भावनांच्या सिद्धांताविषयी गायकवाड, सरदेसाई डॉ. बी.एन. व हनमाने लिहितात की, ''हेगेल आणि कॉम्त या दोघांनी मानवी मन व भावना यांचा इतिहासातील कार्यकारणपरंपरेमध्ये जो प्रचंड सहभाग असतो त्याचे महत्त्व वेळोवेळी प्रस्थापित केले आहे.''[१२]

**ग) मार्क्सचा सिद्धांतः** मार्क्सने ऐतिहासिक घटनांच्या पाठीमागे आर्थिक कारण असते असा सिद्धांत मांडला संपूर्ण मानव जातीचा इतिहास हा वर्गसंघर्षाचाच इतिहास आहे हा विचार मांडला. मार्क्सने वर्गकलहाची कारणे देतांना आहे रे व नाही रे हे दोन वर्ग पाडले ते कार्यकारणभावच आहे. मार्क्सने ऐतिहासिक घटनांची कारणपरंपरा जोडत असतांना भौतिकवादी दृष्टिकोनातून कार्यकारणभाव सिद्ध करून दिला तसेच ज्या वर्गाच्या ताब्यात उत्पादनाची साधने असतात. त्याच वर्गाच्या ताब्यात समाजाचे नेतृत्त्व म्हणजे कार्यकारणभाव आहे. मार्क्सचे साम्यवादाचे भाष्य हा सुद्धा कार्यकारणभावच आहे.



Scanned with CamScanner

**ह) शास्त्रीय सिद्धांतः** इतिहासलेखनाची शास्त्रीय पद्धत रँकेने मांडली. ऐतिहासिक घटनेची सत्यासत्यता ठरवित असतांना कार्यकारणभाव, शास्त्रीय स्पष्टीकरण, अंतरंग व बाह्य परिक्षण, वस्तुनिष्ठता हे सर्व संस्कार रँकेनेच इतिहासात आणले पुढे ब्युरीने इतिहास हे शास्त्र आहे असे जाहिर करून इतिहासाला शास्त्रशुद्ध बनविण्याचा मार्ग खुला करून दिला. ब्युरीनंतर अनेक इतिहासकारांनी यात मोलाची भर घालून स्पष्टीकरण, नियम, सामान्यीकरण, तत्वज्ञान इत्यादी बाबतीत कामगिरी करून ऐतिहासिक संशोधनाला भौतिकशास्त्राचा दर्जा प्राप्त करून दिला आहे.

**य) ऐतिहासिक मतप्रणालीः** जर्मनीत ऐतिहासिक पद्धतीच्या विचारसरणीची स्थापना विल्यम डिथली यांनी केली. हेगेलची जगाच्या इतिहासाची कल्पना डिथलिने पुढे नेली. इतिहास हा घटनांवर आधारीत पण अनुभवांच्या सहाय्याने लिहावा असे मत व्यक्त केले. इतिहासातील ज्ञान हे गतकाळाशी संबंधीत असते गतकाळ व वर्तमानकाळ यांच्यातील कधीही न संपणारा संवाद म्हणजे इतिहास असे प्रो. कार म्हणतात. जर एखादी घटना भुतकाळातील असुनसूद्धा जर ती वर्तमानकाळासाठी उपयुक्त ठरत असेत तर त्या घटनेला काही अर्थ असतो. ऐतिहासिक पद्धतीमध्ये कागदपत्राचा शोध घेणे त्याचा अर्थ लावणे व निष्कर्ष काढणे अशी त्रिविध कामे केली जातात ही ऐतिहासिक पद्धत दिवसेंदिवस एक शास्त्रीय पद्धत म्हणून मान्यता पावत आहे.

**जे) अनेकविध कारणांचा सिद्धांतः** इतिहासामध्ये पुर्वी अशी समजूत होती की, एखादी घटना घडण्यासाठी एकच कारण असते ते म्हणजे दैवी कारण परंतु हळूहळू या कारणपरंपराच्या सिद्धांतामध्ये बदल होत गेला व आज एखादी ऐतिहासिक घटना घडत असतांना राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, प्रशासकीय पक्षाचे धोरण इत्यादी अनेक कारणे असू शकतात. इतिहासाच्या सहाय्यकारी शास्त्रांमध्ये गृहित धरलेली कारणे आणि इतिहासातील अनेक कारणे या सर्वांचा समन्वय साधून एखाद्या घटनेचा कार्यकारणभाव शोधला जातो.

**के) परिस्थितीचा सिद्धांतः** इतिहासकार ओकेशहॉट यांचे असे म्हणणे आहे की, परिस्थितीयो की समुचित व्याख्या में ही कारण के स्पष्ट प्रभाव को ढुंढा जा सकता है। अतः कार्यकारण संबंधोका उचित वर्णन जब परिस्थितीयों के संदर्भ में किया जाता है तब घटना के कारण स्वरूप परिस्थितीयाँ महत्त्व प्राप्त करती है।"[१३]

**प्रो. वाल्शनेसुद्धा** यासंदर्भात लिहिले आहे की, कोणत्याही अंतिम कारणाचे ज्ञान तेव्हाच शक्य आहे. जेव्हा गतकाळातील परिस्थितीच्या संदर्भात त्याच्या प्रभावाला शोधले जावे.

**एल) योगायोगाचा सिद्धांतः** पहिल्या महायुद्धानंतर योगायोगाचा सिद्धांत मांडला जाऊ लागला. एखादी घटना अचानक अनपेक्षित घडते. तिची कारणे कळत नाहीत तो योगायोग वाटतो. इतिहासात अनेक कारणांचे स्पष्टीकरण मिळत नाही. अनेक गोष्टी अकालनिय वाटल्यामुळे ते योगायोग आहे असे समजले जात होते. इतिहासकाराने घटनेचे कारण शोधू नये. घटना योगायोगाने घडतात हे मान्य करून इतिहास लिहावा. परंतु याचा गहन विचार केल्यास कारणमिमांसेत योगायोगाला स्थान देण्याचे कारण नाही. कारण घडणारी घटना कोणत्यातरी कारणाने घडते.

**६) इतिहासातील कारण व संदर्भः** इतिहासामध्ये जी कारणे दिलेली असतात ती कारणे व त्याचा संदर्भ ही इतिहासलेखन प्रक्रियेत एका विशिष्ट साच्यात बसविली जातात. इतिहासात एखाद्या घटनेची दोन्ही बाजू आपले मत मांडत असतांना पुरावा सादर करतात त्यामुळे त्यातील कोणती बाजू सत्य हा एक प्रश्न सतत विचारला जातो. ज्यावेळी ही कारणपरंपरा व त्याचा संदर्भ हा प्रस्थापित केला जातो तेव्हा Root cause व Real cause असे दोन प्रकार करून त्यामध्ये संदर्भ प्रस्थापित केला जातो. इतिहासकाराने आपली विचारसरणी निश्चित करून त्या विचारसरणीनुसार कारणे शोधली पाहिजेत. म्हणजे कारणेही स्पष्ट होतात आणि संदिग्धपना राहत नाही. कार्यकारणभावात घटनांची निवड व वैयक्तिक दृष्टिकोन हा सर्वात महत्त्वाचा असतो.

**निष्कर्ष:**

इतिहास कसा घडला? बदल घडून येण्यासाठी कोणकोणत्या घटना घडल्या? त्यासाठी कोणकोणती कारणे कारणीभूत ठरली? कारणांचा शोध घेणे व या प्रश्नाची उत्तरे शोधने म्हणजे कार्यकारणभाव होय.

## संदर्भ ग्रंथ सूची


१) कोठेकर शांता, "इतिहास तंत्र आणि तंत्रज्ञान" श्री साईनाथ प्रकाशन नागपूर २००५ पृष्ठ क्र. ८४

२) शेख गफुर, "इतिहासलेखनशास्त्र" प्रितम पब्लीकेशन जळगाव, २००७ पृ. क्र. १४७




Scanned with CamScanner

३) गद्रे प्रभाकर, ''इतिहासलेखनाच्या परंपरा'' श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००४ पृष्ठ क्र. २६

४) सरदेसाई बी.एन., ''इतिहासलेखनपद्धती'' फडके प्रकाशन कोल्हापूर २०११ पृ. क्र- ४१

५) शेख गफुर, ''इतिहासलेखनशास्त्र'' प्रितम पब्लीकेशन जळगाव, २००७ पृ. क्र. १४७

६) गायकवाड, सरदेसाई डॉ. बी.एन.व हनमाने, ''इतिहासलेखनशास्त्र'' फडके प्रकाशन कोल्हापूर १९९६ पृ. क्र. ११४

७) कित्ता पृष्ठ क्र. ११६

८) कोठेकर शांता, ''इतिहास तंत्र आणि तंत्रज्ञान'' श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर २००५ पृष्ठ क्र. ८५

९) गायकवाड, सरदेसाई डॉ.बी.एन.व हनमाने, ''इतिहासलेखनशास्त्र'' फडके प्रकाशन कोल्हापूर १९९६ पृष्ठ क्र. १२२

१०) सरदेसाई बी.एन. ''इतिहासलेखनपद्धती'' फडके प्रकाशन कोल्हापूर २०११ पृष्ठ क्र. ४३

११) गायकवाड, सरदेसाई डॉ. बी.एन.व हनमाने, ''इतिहासलेखनशास्त्र'' फडके प्रकाशन कोल्हापूर १९९६ पृष्ठ क्र. १२२

१२) कित्ता पृष्ठ क्र. १२६

१३) खुराना के.एल. व बंसल आर.के. ''इतिहास लेखन धॉरनाएँ तथा पद्धतियाँ'' लक्ष्मी नारायण अग्रवाल प्रकाशन आगरा २०१२ पृष्ठ क्र. ४५

**लेखक- प्रा. डॉ. महेंद्र गायकवाड, इतिहास विभाग, पी.डब्ल्यू.एस.कला व वाणिज्य महाविद्यालय कामठी रोड, नागपूर**



Scanned with CamScanner

❖ प्रकाशक :

मेहेरबाबा पब्लिशर्स

हसनबाग पोलिस चौकी जवळ,

हसनबाग रोड, न्यु नंदनवन, नागपूर-९

मो. ९९२३६३०३१५, ८०८७४६०४७०

E-mail: meherbabapublishers0616@gmail.com

© सर्व हक्क प्रकाशकाधिन

प्रथम आवृत्ती- जानेवारी-२०१८

ISBN- 978-93-87558-08-3

या अंकातील लेखकाच्या मताशी संपादक मंडळ किंवा इतिहास परिषद सहमत असेलच असे नाही ती संशोधकांनी, लेखकांनी मांडलेली त्यांची स्वतंत्र मते आहेत.

Scanned with CamScanner

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर, संत गाडगेबाबा विद्यापीठ
अमरावती व गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

## इतिहास परिषद अधिवेशन - ५१ वे

# निवडक शोध निबंध

## खंड एकोणवीसावा

(२०१८-२०१९)



संपादक
डॉ. शरद बेलोरकर

Scanned with CamScanner

# इतिहास परिषदेची कार्यकारीणी

**अध्यक्ष**

प्रा. डॉ. विरेंद्र गोपालसिंह बैस

**उपाध्यक्ष**

प्रा. डॉ. मनिष चव्हाण (नागपूर)

प्रा. डॉ. रवींद्र मुन्द्रे (अमरावती)

प्रा. राजेंद्र देवाळकर (चंद्रपूर-गडचिरोली)

**सचिव**

प्रा. डॉ. शरद बेलोरकर

**सहसचिव**

प्रा. डॉ. संजय ठवळे (नागपूर)

डॉ. प्रविण सरदार (अमरावती)

डॉ. मिलिंद भगत (चंद्रपूर-गडचिरोली)

**विभागीय प्रमुख**

प्रा. डॉ. महेंद्र गायकवाड (नागपूर)

प्रा. डॉ. वैशाली भाकरे (अमरावती)

प्रा. जयंत काकडे (चंद्रपूर-गडचिरोली)

**सदस्य**

प्रा. डॉ. ओमप्रकाश बोबडे (अमरावती शहर)

प्रा. डॉ. संदीप राऊत (अमरावती ग्रामीण)

प्रा. डॉ. रवि लोणारे (नागपूर शहर)

प्रा. डॉ. हिर्तेंद्र तागडे (नागपूर ग्रामीण)

प्रा. डॉ. संतोष गोहोकार (चंद्रपूर-गडचिरोली शहर)

प्रा. संजय उगेमुगे (चंद्रपूर-गडचिरोली ग्रामीण)

Scanned with CamScanner

प्रकाशक:
**मेहेरबाबा पब्लिशर्स**
हसनबाग पोलिस चौकी जवळ,
हसनबाग रोड, न्यु नंदनवन, नागपूर-९
मो. ९९२३६३०३९५, ८०८७४६०४७०
E-mail: meherbabapublishers0616@gmail.com

---

सर्व हक्क प्रकाशकाधिन
प्रथम आवृत्तीः फेब्रुवारी, २०१९

ISBN- 978-93-87558- 31-1

---

या अंकातील लेखकाच्या मताशी संपादक मंडळ किंवा इतिहास परिषद सहमत असेलच असे नाही ती संशोधकांनी, लेखकांनी मांडलेली त्यांची स्वतंत्र मते आहेत.

Scanned with CamScanner

१३) पेशवा माधरावाच्या नागपूरकर भोसल्यांवरील स्वाऱ्या..............८५-९३
डॉ. प्रशांत कोठे
१४) राज्यसमाजवाद आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर..............९४-९९
प्रा. डॉ. मोहन कापगते
१५) प्राचीन भारतातील नागरिकरण.................................१००-१०५
प्रा. श्रीकांत डि. पानघाटे
१६) इतिहास लेखनशास्त्रातील कागदपत्रांचे परीक्षण..................१०६-११७
प्रा. डॉ. महेंद्र गायकवाड
१७) जाधव घराण्याचे ऐतिहासिक कार्य– एक अभ्यास..............११८-१२४
प्रा. डॉ. चंद्रशेखर क्षीरसागर
१८) राजे विश्वेश्वरराव महाराज व्यक्ती आणि कार्य.................१२५-१३२
प्रा. अरुण बी. आलेवार
१९) डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शैक्षणिक कार्यांचे ऐतिहासिक अध्ययन..१३३-१३६
प्रा. डॉ.शरद आर. डवरे
प्रा. डॉ. विलास फरकाडे
20) Impact of Marathas on the Religious scene of Malwa.........137-140
Hrushikesh D. Dalavi,
21) Traditional Water Harvesting Systems of India.....................141-148
Mr. Himanshu M. Mahajan
22) The Ajanta Caves Paintings: A Historic, Technical, & Cultural Analytical Study..........................................................................149-155
Shri. Chandrashekhar L. Korey
23) Dr. Ambedkar's Educational Thoughts............................156-161
Dr. Sujata H. Gaurkhede

# इतिहास लेखनशास्त्रातील कागदपत्राचे परीक्षण

**प्रा. डॉ. महेंद्र गायकवाड**

इतिहास ज्या कागदपत्रांच्या, पुराव्याच्या किंवा साधनांच्या आधारे लिहायचा असतो ती कागदपत्रे, पुरावा किंवा साधने कितपत खरी आहे याची खात्री करून घेण्यासाठी त्यांचे परीक्षण करावे लागते. परीक्षणाखेरीज कागदपत्रे पुरावा म्हणून वापरता येत नाही. गतकाळाची माहिती देण्याचे काम कागदपत्रे करतात त्यातून मिळणाऱ्या माहितीचे परीक्षण करणे आवश्यक असते. मुळ कागदपत्रे विश्वासार्ह आहे की नाही याची खातरजमा करणे आवश्यक असते. मूळ कागदपत्रातील माहितीच्या सत्यतेविषयी खात्री पटल्याशिवाय त्याचा पुरावा म्हणून उपयोग करता येत नाही मूळ कागदपत्रांचे परीक्षण करताना संशोधकाची भूमिका ही तपासनीसाची असते. माहिती पुरावा म्हणून वापरतांना त्यावर परीक्षणाची प्रक्रिया करावी लागते. परीक्षण प्रक्रियेचे कार्य डॉक्टरने रोग्याचे शव विच्छेदन करण्यासारखे असते. संदर्भ साधनरूपी कागदपत्रातील चुका टाळणे आणि सत्य पुरावे निरखून घेणे हाच परीक्षणाचा उद्देश असतो. प्रा. गफूर शेख परीक्षणाचे महत्त्व सांगताना लिहितात की, ‘‘संदर्भ साधनाची पडताळणी केल्याशिवाय त्यांचे महत्त्व इतिहास संशोधन आणि इतिहासलेखन या दृष्टीकोनातून आपल्या लक्षात येणार नाही त्याशिवाय त्यांची उपयुक्तता सिद्ध होणार नाही म्हणूनच संदर्भ साधनाची पडताळणी करणे अत्यावश्यक असते.’’[१]

ऐतिहासिक कागदपत्रांचे परीक्षण करताना किंवा मूळ कागदपत्रांची विश्वासार्हता निश्चित करताना बहिरंग व अंतरंग परीक्षण करावे लागते.

## १) बहिरंग परीक्षण

बहिरंग परीक्षण ही कागदपत्रांच्या तपासणीची प्राथमिक प्रक्रिया होय. संशोधकाच्या हाती कागदपत्रे आल्यानंतर त्यांची सत्यता पारखून घ्यावी लागते. कागदपत्राच्या



Scanned with CamScanner

खरेपणाविषयी शंका उपस्थित करून तपासणीला सुरूवात करावयाची असते. बहिरंग परीक्षण म्हणजे काय? याविषयी प्रा. सुहास राजदेरकर लिहितात की, ''कोणतेही कागदपत्र अस्सल आहे की नक्कल आहे याची शहानिशा करणे, लेखकाची माहिती काढणे, कोणत्या काळात ते कागदपत्र लिहिले गेले असावे याचा विचार करून अंदाज बांधणे, लिहिलेला मजकूर हा कोणत्या पुराव्याच्या आधारे तयार झाला आहे याचा विचार करणे म्हणजे बहिरंग परीक्षण होय.''[२]

मुळ कागदपत्रांची सत्यता तसेच स्थान व काळ पडताळून पाहणे हा बहिरंग परीक्षणाचा मुख्य उद्देश असतो. मूळ कागदपत्राचा लेखक कोण? त्याचा काळ कोणता व स्थळ कोणते? याची खातरजमा केल्याखेरीज परीक्षणाची पहिली पायरी ओलांडून पुढे जाता येत नाही. कागद जर संशोधन विषयाशी संबंधीत नसेल. लेखक समकालीन नसेल आणि कागद जर बनावट वाटत असेल तर पुढील परीक्षणाची गरज नाही. कागदपत्र तिथेच ताज्य ठरते. जर कागदपत्राच्या सत्यतेबद्दल शंका नसेल तर त्याचे बहिरंग परीक्षण झाले असे समजावयास हरकत नाही.

### अ) प्रश्नपद्धती

बहिरंग परीक्षणाची सुरूवात प्रश्न विचारण्यामधून होते. उपलब्ध कागदपत्रांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित करताना डॉ. शांता कोठेकर लिहितात की, ''

